दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २१२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२७ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# सर्व बहुजन समाजाला एकत्र घेऊन आरक्षण मिळवायचे आहे : खा.संभाजी राजे भोसले

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आम्हाला कोणाचेही ताटातील काढून घ्यायचे नाही आणि सर्व बहुजन समाजाला सोबत घेऊन जायचे आहे असे मत कर्जत येथील संवाद यात्रेत मांडले. शासनकर्ते ऐकणार नसतील मराठा आरक्षणासाठी लाँग मार्च काढला जाईल आणि पुण्यातून लाखो मराठा बांधव पायी चालायला लागतील असे यावेळी छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी जाहीर केले.



आज २६ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी राजे भोसले यांचाच कर्जत तालुका संवाद दौरा आयोजित करण्यात आला होता. मराठा समाजाच्या तरुणांना शैक्षणिक आणि नोकरी मध्ये आरक्षण मिळावे यासाठी पुकारलेली संवाद यात्रा कर्जत तालुक्यात आली. कर्जत तालुक्यातील संवाद दौऱ्याची सुरवात पळसदरी येथील स्वामी समर्थ मठ या पुण्यभूमी पासून केली. तेथून महाराजांची संवाद यात्रा कर्जत तालुक्यात आली, कर्जत चारफाटा येथे या संवाद यात्रेचे स्वागत करण्यासाठी कर्जत तालुक्यातील जनसागर लोटला होता. पुढे छत्रपती संभाजी युवराज हे कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पोहचले. तेथे कर्जत नगरपरिषदच्या वतीने छत्रपती संभाजी युवराज यांचे स्वागत नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांचे हस्ते झाले. त्यानंतर १०० हुन अधिक वाहनांचा ताफा हा मुद्रे नानामस्तर येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी पोहचले. तेथून छत्रपती संभाजी हे कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौकात वासरे परिसरातील शिवप्रेमींनी छत्रपती संभाजी युवराज यांचे स्वागत केले. तेथून ही संवाद यात्रा कर्जत-मुरबाड राजमार्गाने पोसरी येथे पोहचली,तेथे कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी छत्रपती संभाजी युवराज यांचे स्वागत केले. कडाव येथे शेकडोच्या संख्येने शिवप्रेमी स्वागत केले.

कशेळे येथे सकल मराठा समाजाचे वतीने छत्रपती संभाजी राजे भोसले यांचे स्वागत करण्यात आले. त्यापुढे ही संवाद यात्रा भीमाशंकर रस्त्याने नेरळ येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचले. तेथे छत्रपती संभाजी युवराज यांचे स्वागत करण्यासाठी सर्व जाती धर्माचे लोक उपस्थित होते, त्यामुळे युवराजांनी त्या ठिकाणी उपस्थित शिवप्रेमी यांच्याशी संवाद साधणे. त्यावेळी बोलताना छत्रपती संभाजी युवराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांना अभिप्रेत असलेला महाराष्ट्र मला नेरळ मध्ये दिसून आला. आम्ही सकल मराठा समाजाकडून राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांना विनंती केली आहे. त्यांनी आपली भूमिका जाहीर करावी आणि मराठा समाजातील गरीब जनतेला न्याय द्यावा असे आवाहन यावेळी केले.

## पाणी नाही, पाणीपट्टी मात्र दुप्पट ; खारेपाटातील ग्रामस्थांचे आज आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

एकीकडे खारेपाट विभागात पाणी नाही मात्र रायगड जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने पाणीपट्टी मध्ये दुप्पट वाढ केली असल्याने संतप्त झालेल्या खारेपाट विभागातील ग्रामस्थ आज बुधवारी रायगड जिल्हा परिषदेच्या पेण येथील पाणीपुरवठा विभागाचे कार्यालयासमोर पाणीपट्टी बिलाची होळी करून आपला निषेध व्यक्त करणार असल्याची माहिती खारेपाट विकास संकल्प संघटनेचे अध्यक्ष प्रकाश माळी यांनी दिली आहे.

पेण तालुक्यातील वाशी, शिर्की खारेपाट विभागाचा पाणी प्रश्न पेटला आहे. अपुरा व गढूळ पाणी पुरवठा होत असताना जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडुन खाजगी नळकनेक्शन धारकांना दोन हजार २०० रुपये इतके पाणीपट्टीचे बिल बजावण्यात आले आहे. खारेपाट विभागाला गेली कित्येकवर्ष अशुद्ध व अपुरा पाणीपुरवठा केला जात आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेने पाणीपट्टीत दुपटीने वाढ करून खारेपाटाच्या जनतेवर खुप मोठा अन्याय असल्याचे प्रकाश माळी यांनी सांगितले.

रायगड जिल्हा परिषदेने पाणीपट्टीत वाढ केल्याच्या कृतीचा निषेध नोंदवून रायगड जिल्हा परिषदेच्या पेण येथील पाणी पुरवठा कार्यालयाच्या समोर आज बुधवार (दि. २७) रोजी सकाळी १०.३० वाजता पाणीपट्टी बिलाची होळी करण्यात येणार आहे. खारेपाट विभागाला शुध्द व मुबलक पाणी मिळाल्या शिवाय या पाणीपट्टी दरात करण्यात आलेली वाढ मान्य करण्यात येणार नसल्याचे माळी यांनी सांगितले.

## वीजबिल रोखीने भरण्यासाठी आता पाच हजारांची मर्यादा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महावितरणच्या सर्व वर्गवारीतील ग्राहकांना येत्या सोमवारपासून वीजबिल रोखीने भरण्यासाठी दरमहा पाच हजार रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मात्र वीजग्राहकांना केव्हाही व कुठूनही विनामर्यादा रकमेचे वीजबिल भरण्यासाठी महावितरणचे मोबाईल ॲप तसेच www.mahadiscom.in या संकेतस्थळावर ‘ऑनलाईन’ सेवा उपलब्ध आहे. ही सेवा सोयीची व सुरक्षित असून महावितरणचे ७५ लाख ग्राहक दरमहा ‘ऑनलाईन’ वीजबिल भरीत आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार महावितरणकडून वीजबिलांच्या भरण्याद्वारे रोखीने स्वीकारण्यात येणाऱ्या रकमेवर १ नोव्हेंबरपासून निर्बंध लागू करण्यात आले आहे. त्याप्रमाणे ग्राहकांना वीजबिलांचा रोखीने भरणा करण्यासाठी यापुढे पाच हजार रुपयांची मर्यादा राहणार आहे. परंतु त्यापेक्षा अधिक रकमेचे वीजबिल भरण्यासाठी ‘ऑनलाईन’ सेवा उपलब्ध आहे. तसेच धनादेशाद्वारे देखील रक्कम स्वीकारली जाणार आहे. तथापि मुदतीनंतर धनादेश क्लीअर झाल्यास विलंब आकार शुल्क आणि कोणत्याही कारणास्तव धनादेश अनादरित झाल्यास प्रत्येक वीजबिलासाठी ७५०/- रुपये बँक ॲडमिनिस्ट्रेशन चार्जेस व त्यावरील १८ टक्के जीएसटी कराचे १३५/- रुपये असे एकूण ८८५/- रुपये ग्राहकांना भरावे लागणार आहे.

वीजबिलांपोटी पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम भरण्यासाठी ’ऑनलाईन’ची सोय उपलब्ध आहे. महावितरणचे www.mahadiscom.in हे संकेतस्थळ तसेच महावितरण मोबाईल ॲपद्वारे चालू व मागील वीजबिल पाहणे, ’ऑनलाईन’ भरणा करणे तसेच मागील पावत्या व तपशील पाहणे ग्राहकांसाठी घरबसल्या शक्य आहे. एकाच खात्यातून स्वतःच्या अनेक वीजजोडण्यांचे बील भरण्यासह इतर सेवा उपलब्ध आहे. तसेच क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, युपीआय, भीम, इंटरनेट बॅकींग, मोबाईल वॉलेट, मोबाईल बॅकिंगद्वारे भरणा केल्यास वीजबिलामध्ये ०.२५ टक्के .../२

## संक्षिप्त...

### क्रूझ ड्रग्ज पार्टीप्रकरणी दोन आरोपींची जामिनावर सुटका

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आर्यन खान ड्रग्ज पार्टी प्रकरणात आज दोन आरोपींना जामीन मंजूर झाला आहे. विशेष छ्ड्झड कोर्टाने आज या प्रकरणात दोघांची जामिनावर सुटका केली आहे. मनिष राजघारिया आणि अविन साहू अशी या दोन सहआरोपींची नाव आहेत. या दोघांना कोर्टाने ५० हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात जामीन मंजूर झालेले हे पहिलेच दोन आरोपी आहेत.

मनिष राजघारीया आणि अविन साहू हे दोघे क्रूझवरचे प्रवासी असल्याचं सांगण्यात आलं. एनसीबीने राजघारीयाकडून २.४ ग्रॅम गांजाही जप्त केला होता. तर अविन साहूकडून काहीही जप्त करण्यात आलं नव्हतं. कोर्टाने गेल्या आठवड्यात या दोघांच्या जामिनावरचा निर्णय राखून ठेवला होता, अशी सहआरोपी मनिष राजघारियाचे वकील अजय दुबे यांनी माहिती दिली आहे.

न्या. व्ही. व्ही. पाटील मंगळवारी यावर सुनावणी घेतली. वकील अयाझ खान यांनी नुपूर सतलेजाच्या बाजूने युक्तीवाद केला होता. आर्यन खान, अरबाज मर्चंट आणि मुनमुन धामेचा यांच्या जामीन अर्जांवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.

## एम.एस.आर.डी.सी प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी

### संरक्षण कठडे तुटल्याने जिवघेण्या अपघाताचा धोका



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सरकारी काम आणि बारा महिने थांब या म्हणीचा प्रत्येय पाली खोपोली मार्गावरील जंगली पीर आंबा नदीकाठावरील वर्षभरापासून तुटलेल्या संरक्षण कठडे पाहिल्यावर येतो. संरक्षण कठड्याअभावी वेगवान वाहने नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची भिती असताना एम.एस.आर.डी.सी प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून अपघाताच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसते.

पाली खोपोली राज्य महामार्गाच्या वहातुक सुरक्षेसह प्रशासनाने येथील तुटलेले कठडे तातडीने बसवावेत अन्यथा तिव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा लयभारी आदिवासी विकास संस्थेच्या कार्याध्यक्षा तथा मनसे नेत्या लताताई कळंबे यांनी दिला आहे. अनेक ठिकाणी धोकादायक वळणे व अपघाती क्षेत्र असूनही कोणतेही सूचना फलक याठिकाणी नाहीत, संरक्षण कठड्याच्या गंभीर समस्येकडे सातत्याने वृत्तपत्रातून आवाज उठवूनही गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाला जाग येत नसल्याचे पाहून प्रवाशी जनतेतून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. वहातुक व प्रवासाच्या दृष्टीने जंगली पिरनजीक नदीकाठी संरक्षण कठडे असणे अत्यंत गरजेचे आहे.

अरुंद व वळणाच्या रस्त्यावर नदीच्या बाजूने वेगवान वाहने जात येत असतात. यापुर्वी याठिकाणी अपघाती घटना घडल्या आहेत. अश-ातच वहानचालकाचा वहानावरुन ताबा सुटल्यास संरक्षण कठडे नसल्याने वहान खोल नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची शक्यता आहे. आंबेनळी घाटात झालेल्या अपघाताची पार्श्वभुमी पाहता संरक्षण कठड्याचे महत्व प्रशासनाने जाणणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतर घोडे नाचविण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये याकरीता योग्य ती उपाययोजना करुन आधिच खबरदारी घेणे अधिक उपयुक्त ठरते. जंगली पीर नदीकाठचे संरक्षण कठडे एम.एस.आर.डी.सी प्रशासनाने तत्काळ बसवावेत अन्यथा भविष्यात होणार्या जिवघेण्या अपघातास प्रशासनाला जबाबदार धरले जाईल असा इशारा लताताई कळंबे यांनी दिला आहे.

## विचुंबे, पालीदेवद आणि उसर्लीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या काळानंतर राजकारणातील घडामोडींनी आता वेग घेतला आहे. राजकीय पक्षांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आपली बांधणी सुरु केली आहे. पनवेल तालुक्यातील विचुंबे, देवद आणि उसर्ली गावातील असंख्य नागरिकांनी मोठ्या संख्येने मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत आणि महिला जिल्हासंघटिका सौ. रेखा ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

या परिसरात मुंबई, ठाणे येथून वास्तव्यास आलेले नागरिक आहेत. शिवसेनेच्या या जम्बो प्रवेशाने येथील वातावरण शिवसेनामय झाले होते. या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, उपमहानगर संघटिका नवीन पनवेल कु. मंदा जंगले आणि शाखा प्रमुख विशाल भोईर यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी रायगड जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, उपजिल्हा संघटक परेश पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, पनवेल ग्रामीण तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकुर, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख यतीन देशमुख, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, विभाग संघटिका सौ. स्मिता भोईर, उपविभाग संघटीका सौ. शारदा पाटील, शाखा संघटिका सौ. ज्योती पाटील शहर प्रमुख कामोठे राकेश गोवारी, खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के, कळंबोली शहर प्रमुख डी.एन. मिश्रा,



महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका सौ. कल्पना पाटील, विधानसभा संघटिका सौ. रेवती सकपाळ, तालुका संघटिका सौ.मेघा दमडे, तालुका संघटिका सौ. अनीता डांगरकर, युवासेनेचे जिल्हा अधिकारी मयूर जोशी, उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, तालुका अधिकारी केवल माळी, विधानसभा .../२

## दिघी येथील टपाल कार्यालय पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी खा.सुनिल तटकरे यांचे प्रयत्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथे पूर्ण क्षमतेने टपाल कार्यालय सुरू व्हावे यासाठी रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री. सुनिल तटकरे यांनी मुख्य पोस्ट मास्टर जनरल हरिष अग्रवाल, नवी मुंबईचे पोस्ट मास्टर जनरल गणेश सावळेशरकर तसेच श्रीमती शरण्या मॅडम - संचालक पोस्टल सुविधा यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा केली. यावेळी साजिद करजीकर, सनाउल्लाह फिरफिरे व ग्रामस्थही उपस्थित होते.

नागरिकांना अधिक प्रभावी व जलद टपाल सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी हे टपाल कार्यालय पूर्ववत पूर्ण क्षमतेने सुरू होणे आवश्यक असल्याचे खा. तटकरे यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यांची मागणी लवकरात लवकर पूर्ण करण्याची हमी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली.



## जेएनपीटीने ५ कोटी खर्चाचा मॅनग्रोव्ह इको पार्क प्रकल्प गुंडाळला

### कांदळवन, खारफुटीच्या जागा संवर्धन व संरक्षण करण्यासाठी वनविभागाकडे सुपुर्द करण्याचे आदेश



**दै.रायगड नगरी । उरण**

पर्यावरण प्रेमी संस्थांच्या याचिकेनंतर उच्च न्यायालयाने कांदळवन, खारफुटीच्या जागा संवर्धन व संरक्षण करण्यासाठी वनविभागाकडे सुपुर्द करण्याचे दिलेले आदेश आणि या पाश्र्वभूमीवर फॉरेस्ट डेव्हलपमेंट ऑफ महाराष्ट्र विभागानेही मॅनग्रोव्ह इको पार्क विकसित करण्याचा प्रस्ताव अमान्य केल्याने जेएनपीटीला सुमारे पाच कोटी खर्चाचा मॅनग्रोव्ह इको पार्क प्रकल्प सध्या तरी गुंडाळावा लागला आहे.

फॉरेस्ट डेव्हलपमेंट ऑफ महाराष्ट्र विभागाच्या मॅनग्रोव्ह सेलच्या मार्गदर्शनाखाली जेएनपीटीने मॅनग्रोव्ह इको पार्क विकसित करण्याची तयारी सुरू केली होती. जेएनपीटीच्या बेलपाडा, सोनारी, सा-वरखार, करळपाडा येथील मालकीच्या जागेत पाच कोटी खर्चाचा हा प्रकल्प दोन टप्प्यांत उभारण्यात येणार होता.पर्यावरण-पर्यटन वाढविण्यासाठी आणि पर्यावरणाच्या जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी पर्यटक आधारित उभारण्यात येणाऱ्या इको टुरिझम प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सामंजस्य करारही तयार करण्यात आला होता.

या प्रकल्पामध्ये इंटरप्रिटेशन सेंटर, पक्षी निरीक्षणासाठी वॉच टॉवर, पार्किंग, गार्डन, पर्यटकांसाठी रेस्टॉरंट, ब्लॉक टॉयलेट्स आदी सोयी सुविधा उप-लब्ध करून देण्याची योजना आखली होती .यामुळे प्रकल्पामुळे जैवविविधतेवरील पर्यावरण-पर्यटन आणि शैक्षणिक क्षेत्रात वाढ होण्यास मदत होणार असल्याने तीन वर्षात हा नियोजित प्रकल्प उभारुन पर्यटकांसाठी खुले करण्याची घोषणा जेएनपीटी अध्यक्ष संजय सेठी यांनी केली होती.

जेएनपीटीचा बंदर उभारणीपासुनचा प्रवास पाहता त्यांनी सुरुवातीपासूनच विविध कामांसाठी खारफुटीच्या जागांचा दुरुपयोग करून पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी केली आहे. स्थानिक मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान केले आहे.जेएनपीटी प्रकल्पामुळे खारफुटी व पाणथळ जागांनाही हानी पोहोचली आहे. स्थलांतरित .../२

# माझी वसुंधरा अभियानांतर्गत माणगांवात पर्यावरण स्वच्छता जनजागृतीपर सायकल रॅली



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मंगळवार दि. २६ ऑक्टोबर रोजी माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार व मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार माझी वसुंधरा अभियानांतर्गत, पर्यावरण संतुलन व स्वच्छता विषयक सायकल रॅली काढण्यात आली. यावेळी माणगांव नगरपंचायत सहाय्यक कार्यालय निरिक्षक यशवंत शेठ, मंगेश पाटील, रामदास पोवार, सिटी को ऑर्डीनेटर अतुल जाधव, सचिन मढवी, निलेश सुतार, रमेश जाधव, अविनाश पाटील, अमित जाधव, विलास भादावकर, मारुती मालोरे व सफाई कर्मचारी यांनी विशेष स्वच्छता संदेशाचे टी शर्ट परिधान करुन रॅलीत सहभागी झाले. त्यांचे सोबत अशोकदादा साबळे विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांची उपस्थिती लक्षणिय होती.

दररोज गाड्यांचे धूरा मुळे तसेच विविध कारणास्तव निर्माण होणाऱ्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी व अत्यंत महत्वाचा स्वच्छता संदेश देण्यासाठीच्या जनजागृतीपर रॅलीचे आयोजन सकाळी ०९.३० वाजता माणगांव नगरपंचायत मार्फत करण्यात आले. ही रॅली माणगांव नगरपंचायत ते कचेरी व कालवारोड, तहसील भवन आणि मार्केट यामार्गे काढण्यात आली. विशेष म्हणजे नगर पंचायत हद्दीत माझी वसुंधरा हे अभियान सुरु असुन शहरात स्वच्छते विषयी दवंडी द्वारे जनजागृती केलेली असतानाही, आपण आपला वैयक्तिक कचरा उघड्यावर/सार्वजनिक ठिकाणी टाकून सार्वजनिक उपद्रव निर्माण करीत आहात. असे नगरपंचायतीचे निदर्शनात आले आहे.

या पुढे शहरात उघड्यावर व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यां-वर नगरपंचायत कर्मचाऱ्यां मार्फत लक्ष ठेवले जात आहे. याउ-परही अशी चुक करताना आपण आढळल्यास घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये आपणावर कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे अशी या निमीत्ताने जनजागृती करण्यात येत आहे.

# दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त कोकण भवनातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. विभागीय महसूल कार्यालयाच्या बैठक सभागृहात सकाळी ११.०० वाजता उपायुक्त (सामान्य) श्री. मनोज रानडे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. यावेळी उपायुक्त (महसूल) श्री.मकरंद देशमुख, उपायुक्त (पुरवठा) श्री.विवेक गायकवाड, उपायुक्त (विकास) श्री.गिरीश भालेराव, उपायुक्त (नगरपालिका) श्री.रविंद्र जाधव हे उपस्थित होते.



दरवर्षी ३१ ऑक्टोंबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती येते, त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा यांबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या २०२१ या वर्षी हा सप्ताह केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दिनांक २६ ऑक्टोबर २०२१ ते १ नोव्हेंबर २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दक्षता जनजागृती सप्ताहाचे बोधवाक्य स्वतंत्र भारत ७५ : सचोटीतून आत्मनिर्भरतेकडे असे आहे.

श्री. मनोज रानडे यांनी यावेळी महाराष्ट्राचे मा. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी व मा. मुख्यमंत्री, उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला दिलेल्या संदेशाचे वाचन केले. त्यानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. याप्रसंगी कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने अक्षता गीधला शिक्षणासाठी ०१ लाख रुपयांची आर्थिक मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उच्च शिक्षण घेण्यासाठी पनवेलमधील अक्षता सुरेश गीध हिला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने ०१ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरच्या मदतीचा धनादेश मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आज (दि.२६ ) डॉ. अर्चना बाथम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.




अक्षता सुरेश गीध हि विद्यार्थिनी विले पार्ले येथील बीएनसीपी कॉलेजमध्ये एम फार्मा शिक्षण घेत आहे. या उच्च शिक्षणासाठी तिला आर्थिक मदतीची गरज होती. त्या अनुषंगाने तिच्या पालकाने केलेल्या मागणीनुसार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल या सेवाभावी संस्थेच्या वतीने ०१ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

---

प्रोसेस फी जमा ५०/- | अर्जदारातर्फे वकील सौ.रश्मी बळीराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अ.क्र.१११६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२९/११/२०२१

श्री.अरविंद सखाराम खारके — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी, शिरढोण, पनवेल — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई ध्रुपदाबाई सखाराम खारके हिचा मृत्यू दि.०८/०६/२००६ रोजी मौजे : शिरढोण येथे राहत्या घरी झालेला आहे. त्यांचा अंत्यविधी ही मौजे : शिरढोण, पनवेल रायगड कै.ध्रुपदाबाई सखाराम खारके हिचे कुटुंबिय तसेच मौजे : शिरढोण गावचे ग्रामस्थ यांचे समोर व त्यांचे परवानगीने झालेला आहे.

तरी सदर मृत्यू दाखल्याचा कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकतीही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. अर्जदार यांचे लाभांत मृत्यूदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख २६/१०/२०२१ रोजी सहीने व कोर्टाने शिक्काने नोटीस दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.उषा अशोक कदम, २) श्रीमती.उज्वला अशोक कदम उर्फ उज्वला सुशील बोरकर, ३) श्रीमती.शुभांगी अशोक कदम उर्फ शुभांगी सुनील सावंत, ४) श्रीमती.अर्चना अशोक कदम उर्फ अर्चना नितीन पवार, ५) श्री.सचिन अशोक कदम रा.घोटकॅम्प, पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल श्री अमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.जुबेर इसाक ख्वाजा, २) श्री.सिराजुल इस्लाम शेख पत्ता : प्लॉट नं.२३ ए, सेक्टर ३५ इ, खारघर, नवी मुंबई ४१०२१० यांनी त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ११ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ६४ | ५०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

---

नमुना क्र.७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग रायगड
जा.क्र.१३३१/२१
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि.रायगड
दि.२५/१०/२०२१

## जाहीर नोटीस

संस्था नोंदणी अर्ज क्रमांक १७६/२०२१
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : Boro Community Welfare Association, Sector 35, Kamothe, Tal-Panvel, Dist-Raigad ...बाबत
श्री.Birendranath Swagiary ...अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहाय्यक संस्था निबंधक रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या संस्था नोंदणी क्रमांक १७६ यासंबंधी संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-

(२३) वर नमूद केलेली संस्था अस्तित्वात आहे काय? आणि सदरची संस्था सार्वजनिक स्वरुपाची आहे काय?

(२४) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर संस्थेच्या मालकीची आहे काय?

(ऐ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम १०००/- रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मी सहाय्यक संस्था निबंधक, रायगड विभाग यांचे शिक्क्यानिशी आज दि.२५/१०/२०२१ रोजी दिली.

**सही/-**
**(श्रीम.अंजली रमेश पिसाळ)**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस असे सुचित करण्यात आहे की, माझे अशिल मे.सुपर स्टार पॅकेर्स अँड मोव्हर्स मर्यादितचे मालक श्री.विनोद सिंग यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरुन, खालीलप्रमाणे जाहीर नोटीस देण्यात येत आहे की,

श्री.रवींद्रनाथ ज. लोणे यांनी माहे जून २०१७ साली त्यांच्या सदनिका क्र.१७०४, ए-विंग, रेव्हिएरा इमारत, कासाबेला, पलावा सिटी, डोंबिवली येथील घरातील सामानाची बांधणी करून इतर ठिकाणी वाहतुकी मार्फत हलवण्याचे काम माझ्या अशिलांना दिले होते व तसेच सदर सामान कामोठे येथील कोठार / वखरीत ठेवण्यास सांगितले होते. त्यानुसार माझे अशिलांनी त्यांच्या घरातील सामान जसे की, घरातील संसार उपयोगी भांडी, फ्रिज, दूरचित्रवाणी, सोफा सेट, आलमारी / कपाट इत्यादी वस्तूंची बांधणी करून कामोठे येथील गाळा क्र.३, साई किरण इमारत, सेक्टर १९ मध्ये ठेवले होते व त्यानंतर गाळा क्र.९, श्री कृपा इमारत, सेक्टर ३५ येथे ठेवले आहे.

मागील चार वर्षापासून सदर श्री.रवींद्रनाथ ज. लोणे यांना वारंवार फोन करूनही त्यांनी त्यांचे सामान नेले नाही व तसेच ठरल्यानुसार माझे अशिलांचे भाडे, वाहतुकीचा, देखभालीचा खर्च व इतर खर्च असे मिळून एकूण रु.२,५७,०००/- अदा केले नाही. सदर बाबीकरिता माझे अशिलांनी त्यांना कायदेशीर नोटीस दिली आहे व त्याबाबत स्थानिक कामोठे, पोलीस ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज केला आहे. मात्र अद्याप श्री.रवींद्रनाथ जी. लोणे यांनी त्याबाबत कोणतीही हालचाल केली नाही. त्यामुळे माझे अशिलांनी सदर सामान भंगारात विकण्याचे ठरवले आहे.

तरी सदर सर्व वस्तू / सामानाबाबत कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध असल्यास किंवा हक्क-अधिकार असल्यास व सदर विक्रीबाबत हरकत / हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्यांचे हक्क, अधिकार व सदर सामानाबाबत मुळ दस्ताऐवजांची मुळ प्रत व प्रमाणित केलेल्या प्रतिसहीत खालील नमूद केलेल्या कार्यालयीन पत्यावर प्रत्यक्षात संपर्क साधून लेखी हरकत नोंदवाव्यात.

वरील बाबीस विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल सदर सर्व सामान / वस्तू भंगारात विक्रीस काढतील व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि.१८/१०/२०२१
स्थळ : पनवेल

**सही/-**
**वकील श्री.सुधीर सखाराम मेढेकर**
**वकील उच्च न्यायालय**
**नोंदणी क्र.महा/१०७०/२०११**
**कार्यालय क्र.७१ व १०३, महालक्ष्मी मॉल, भूखंड क्र.८/८ बी, सेक्टर ३५, कामोठे, पनवेल-रायगड**

---

अर्जदारातर्फे वकील ॲड.सागर गोंधळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी क.स्तर साो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अ.क्र.११३४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.३०/११/२०२१

श्री.अकील इकबाल पटेल
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल शहर महानगरपालिका — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांची मावशी कै.हाजराबीबी अ.गफूर तांबडे ही दि.११/०५/१९८२ रोजी मौजे : तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथील तिच्या राहत्या घरी मृत्यू पावलेली / झालेला आहे. अर्जदार यांची मावशी कै.हाजराबीबी अ. गफूर तांबडे हिच्या मृत्यूची नोंद होण्यासंबंधी संबंधित महानगरपालिका यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता अर्जदार सदरचे अर्ज मे.कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे मृत्यूचा दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मृत्यूचा दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२६ माहे १० सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## वीजबिल रोखीने भरण्यासाठी आता पाच हजारांची मर्यादा

(५००/- रुपयांच्या मर्यादेत) सूट देण्यात येत आहे. क्रेडीटकार्ड वगळता सर्व 'ऑनलाईन'द्वारे होणारा भरणा हा निःशुल्क आहे.

वीजबिलांचा 'ऑनलाईन' पद्धतीने भरणा करणे सोयीचे व सुरक्षित आहे. या पद्धतीला भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) पेमेंट व सेटलमेंट कायदा २००७ च्या तरतुदी लागू आहेत. तसेच 'ऑनलाईन'द्वारे वीजबिल भरणा केल्यानंतर ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर 'एसएमएस'द्वारे पोच दिली जाते. वीज बिल भरण्यासंदर्भात काही तक्रार किंवा शंका असल्यास ग्राहक helpdeskšpgmahadiscom.in या ईमेलद्वारे महावितरणशी संपर्क साधू शकतात. सद्यस्थितीत महावितरणचे ७५ लाख ग्राहक दरमहा सुमारे १४०० कोटी रुपयांच्या वीजबिलांचा 'ऑनलाईन'द्वारे भरणा करीत आहेत.

तसेच लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती किंवा सोसायट्यांच्या ग्राहकांचे वीजबिल १० हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यास त्यांना 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी'द्वारे थेट वीजबिल भरण्याची सोय उपलब्ध आहे. त्यासाठी या ग्राहकांच्या वीजबिलांवर महावितरणच्या बँक खात्याचा तपशील देण्यात येत आहे. वीजग्राहकांनी कोरोना महामारीच्या काळात रांगेत उभे राहून किंवा इतर व्यक्तींच्या संपर्कात येण्याऐवजी 'ऑनलाईन'द्वारे वीजबिलांचा भरणा करावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## विचुंबे, पालीदेवद आणि उसर्लीतील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

अधिकारी पराग मोहिते, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखा प्रमुख, उपशाखा प्रमुख, युवासेना व युवतीसेना पदाधिकारी तसेच महिला आघाडी व शिवसैनिक तसेच विचुंबे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसेना नेहमीच समाजकारणाला महत्व देते असे सांगून या उपनगरातील समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले. जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी शिवसेनेची घोडदौड अशीच सुरु राहणार असून येणाऱ्या सर्व निवडणुकीत शिवसेना चांगल्या प्रकारे यश प्राप्त करेल असा विश्वास व्यक्त केला. उपजिल्हा संघटक परेश पाटील यांनी पनवेल विधानसभा क्षेत्रामध्ये शिवसेनेचा वारू आता रोखू शकणार नाही, पनवेल विधानसभेसाठी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची उमेदवारी जाहीर केली. यावेळी पक्षप्रवेश केलेल्या सर्वांना शिवबंधन बांधण्यात आले.

## जेएनपीटीने ५ कोटी खर्चाचा मॅनग्रोव्ह इको पार्क प्रकल्प गुंडाळला

पक्ष्यांची आश्रयस्थाने नष्ट केली आहेत. खारफुटी कांदळवनाची बेसुमार तोड केल्या प्रकरणी वनविभागाने जेएनपीटीला दंड ठोठावला आहे.

त्यामुळे याआधीच पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास करणाऱ्या जेएनपीटी प्रशासनावरचा पर्यावरणवादी संघटनांचा पुरता विश्वास उडाला आहे. या पाश्र्वभूमीवर जेएनपीटीच्या मॅनग्रोव्ह इको पार्क विकसित करण्याच्या प्रस्तावाला पर्यावरणवादी संघटनांनी कडाडून विरोध दर्शविला होता. इतक्यावरच न थांबता २०१८ मध्ये काही पर्यावरण प्रेमी संस्थांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने सप्टेंबर २०१८ च्या जेएनपीटी अंतर्गत असलेल्या खारफुटी वनांचे संवर्धन,संरक्षण करण्यासाठी खारफुटीं,समुद्री वनस्पतीने व्यापलेल्या जागा संबंधित विभागाकडे सुपूर्द करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर फॉरेस्ट डेव्हलपमेंट ऑफ महाराष्ट्र विभागानेही मॅनग्रोव्ह इको पार्क विकसित करण्याचा प्रस्ताव अमान्य केल्याने जेएनपीटीला सुमारे पाच कोटी खर्चाचा प्रकल्पाला धक्का बसला आहे.यामुळे प्रकल्पच गुंडाळण्याची नामुष्कीची पाळी जेएनपीटीवर येऊन ठेपली आहे.

---

राव साहेब
अर्जदाराचे वकील : सुधीर स. मेढेकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, यांचे न्यायालय, पनवेल, जि.रायगड
दि.चौ.अ.क्र.६८८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

१) श्री.निजामुद्दीन इब्राहीम मुल्ला
वय वर्षे ७२, काम : निवृत्त
२) सौ.नाजला नईम मिरकर
उर्फ नाजला निजामुद्दीन मुल्ला
वय वर्षे ३२, काम : गृहिणी
रा.फ्लॅट क्र.२०६, ए-विंग, ब्लू हेवन,
प्लॉट नं.०८, सेक्टर ३५, कामोठे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र ४१०२०९ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येत आहे की, कै.मुमताज निजामुद्दीन मुल्ला हे दि.०९/०४/२०१९ रोजी कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहेत. वरील अर्जदार यांनी कै.मुमताज निजामुद्दीन मुल्ला यांच्या खालील नमूद मिळकती संदर्भात वारस दाखला मिळणेकामी या माननीय मे.वरिष्ठ दिवाणी न्यायालय, पनवेल, जिल्हा : रायगड यांच्याकडे अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट क्र.२०६, क्षेत्र ५९.८५ चौ.मीटर बांधीव क्षेत्र, ए-विंग, ०२ रा मजला, ब्लू हेवन, प्लॉट क्र.०८, सेक्टर ३५, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, राज्य-महाराष्ट्र ४१०२०९**

तरी सदरचे अर्जदार हे कै.मुमताज निजामुद्दीन मुल्ला यांचे कायदेशीर वारस आहेत, या त्यांच्या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकत / हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मा.न्यायालयात आपली हरकत / हरकती दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आज दि.२१/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साो
वकील : के.बी.करावकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अ.क्र.१४५४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/११/२०२१

१) कु.मयंक राहूल केळकर
२) कु.जिनीत राहूल केळकर तर्फे अ.पालनकर्ता
कु.मयंक राहूल केळकर
दोघेही रा.ए-६०१, नील सागर को.ऑ.हौ.सो.,
प्लॉट नं.३५, सेक्टर १७, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.शाल्मली राहूल केळकर यांचे दि.१९/०४/२०२१ रोजी निधन झाले आहे. सदर चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांनी कै.शाल्मली राहूल केळकर यांच्या खालील नमूद मिळकतीसंबंधी वारस दाखला मिळण्याकरिता मा.न्यायालयात अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**सदनिका क्र.१ चे वर्णन**
**मौजे : नेरे येथील ''महालक्ष्मी नगर'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रोजेक्टमधील बिल्डींग नं.२५, इकॉनॉमी कॅटेगरी, सेक्टर नं.०३, क्षेत्रफळ ४७.६७ चौ.मी., ५१३ चौ.फूट. कारपेट, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्र.२ चे वर्णन**
**फ्लॅट नं.६०१, 'ए' विंग, सहावा माळा, नील सागर को.ऑ.हौ.सो., प्लॉट नं.३५, सेक्टर १७, क्षेत्र २७.५० चौ.मी. + १३.९३ चौ.मी. कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्र.३ चे वर्णन**
**फ्लॅट नं.६०४, 'ए' विंग, सहावा माळा, नील सागर को.ऑ.हौ.सो., प्लॉट नं.३५, सेक्टर १७, क्षेत्र २७.५० चौ.मी. + १३.९३ चौ.मी. कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

याप्रमाणे मिळकतीचे वर्णन

सदरचे अर्जदार क्र.१ व २ हे कै.शाल्मली राहूल केळकर यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या वारस हक्कांबाबत कोणाही व्यक्तीस हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या ना.न्यायालयात आपली हरकत दाखल करावी. विहित मुदतीत हरकत न आल्यास ना.न्यायालयात दाखल केलेल्या अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदरकामी वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.२६/१०/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे महिला स्वरक्षण मार्गदर्शन शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा पोलीस स्टेशन आणि चॅम्पियन कराटे क्लब म्हसळा यांच्या विद्यमाने न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे महिला स्वरक्षण मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

महिला पोलीस स्टाफ, शाळेचे विद्यार्थ्यांनी यांना मार्गदर्शन करताना म्हसळा पोलीस निरीक्षक उध्दव सुर्वे यांनी महिला, मुलींनी कशा प्रकारे आपले स्वरक्षण केले पाहिजे व कशा प्रकारे सक्षम बनले पाहिजे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून महिलांना स्वतःचे रक्षण करता येणे अत्यावश्यक असल्याचे सांगून मुलींनी कराटे, व लाठी-काठी याचे प्रशिक्षणही घेणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.चँम्पियन कराटे क्लब, म्हसळा चे विद्यार्थी यांनी लाठी काठी, कराटे, सेल्फ डिफेन्स याचे उत्तम प्रकारे प्रदर्शन करून व मार्गदर्शन केले. या प्रसंगी पोलीस निरीक्षक उध्दव सुर्वे न्यु ईंग्लिश स्कूल चे प्राचार्य प्रभाकर मोरे, पोलिस हवलदार संतोष चव्हाण, महिला पोलीस घोलप, पाटील मॅडम तसेच चँम्पियन कराटे क्लब म्हसळा प्रशिक्षक अविनाश मोरे, अभय कलमकर, ओमकार राजपूत, युक्ता मुरकर, सिद्धि सावंत, संतोष उध्दरकर आदि मान्यवर उपस्थित होते.

## पॅनेल तयार करण्यासाठी अर्ज सादर करावेत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ, ७८, ७८ अन्वये विभागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनेल तयार करण्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडून कळविण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ, ७८, ७८ अन्वये विभागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यात येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनेल तयार करण्यासाठी शासनातील राज्य शासनाचे गट अ व ब प्रवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी/मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी व सहकार व लेखा पदविका (एच.डी.सी) धारक/चार्टड अकाऊंटंट (सी.ए.) /इन्स्टिटयूट ऑफ कास्ट अँड वकस अकाउंटंट (आय.सी.डब्ल्यु.ए.) /कंपनी सेक्रेटरी (सी.एस.), सहकार खात्यातील प्रशासन/ खापरिक्षण विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, नागरी/कर्मचारी सहकारी बँकांमध्ये व्यवस्थापक (किमान ५ वर्ष अनुभव) कायद्याची पदवी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :- पदवी प्रमाणपत्र आणि जी.डी.सी.अँड अे प्रमाणपत्र, वकील असल्यास सनद प्रमाणपत्र, संगणकीय ज्ञान असलेबाबत प्रमाणपत्र, केवायसी नॉर्मस- जन्म दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, फोटो इ., अनुभवाचा तपशिल संस्थेचे नाव, कामकाजाचा तपशिल पद व कालावधी (पद, कामाचे स्वरुप इ.)अर्जाचे विहित नमुने दि. ०१ नोव्हेंबर २०२१ पर्यंत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे/पालघर/ रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग व त्यांचे अधिनस्त तालुका कार्यालयात, कार्यालयीन वेळेत मिळू शकतील.

# दिवाळीपुर्वी थकित पगार व बोनस मिळावा ; गटविकास अधिकारी यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

दिवाळीपुर्वी थकित पगार, पगार व बोनस (सानुग्रह अनुदान) मिळावा.यासाठी मुरुड तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे तालुका अध्यक्ष संतोष मोरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिकेत पाटील यांना एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी केली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,सद्य स्थितीत वाढत्या महागाईचा विचार करता दिवाळी पुर्वी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी थकित पगार व बोनस मिळणे आवश्यक आहे.तालुक्यातील काही कर्मचा-यांचे सहा ते सात महिने वेतन थकित आहे, शासना मार्फत लागू केलेला सुधारित किमान वेतन आपल्या तालुक्यात काही ग्रामपंचायतींना दिले जात नाही, पंचायत समिती स्तरावर किमान वेतन ग्रामपंचायत हिस्सा बाबत मागणी व ग्रामपंचायत कडून देत नसल्याबद्दल तक्रारी करुनही तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियम १९४८(११) नुसार देय पुर्ण किमान वेतन अदा करण्यास ग्रामपंचायत स्तरावर शासकिय अधिकारी/ पदाधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहेत,

ग्रामपंचायत कर्मचारी यांचे सेवा पुस्तक अद्ययावत करुन घेणे, ग्रामपंचायत कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी त्यांचे संयुक्त खात्यावर जमा करणे, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांना दिवाळी सानुग्रह अनुदान द्यावे, आपल्या स्तरावर ग्रामपंचायत कर्मचारी यांची सभा आयोजित करणे जेणेकरून कर्मचा-यांच्या समस्या व अडिअडचणी दूर होतील तसेच पगार वेळेवर न मिळाल्याने कर्मचारी व कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

तरी आपणाकडून आमच्या तक्रारीचे निवारण व्हावे व दिवाळीपूर्वी थकित पगार, पगार व बोनस मिळावा. अशी मागणी तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र दिव्यांग संघ उत्तराखंड येथे तीन एकदिवसीय सामने खेळण्यासाठी रवाना

**दै.रायगड नगरी । रोहा**

कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र आणि युनायटेड दिव्यांग क्रिकेट असोसिएशन उत्तराखंड यांच्यामध्ये दि. २८ ते ३० ऑक्टो. २०२१दरम्यान तीन एकदिवसीय क्रिकेट सामने खेळण्यात येणार असून यास्पर्धेसाठी कुलाबा दिव्यांग संघ नुकताच उत्तराखंड कडे रवाना झाला आहे.



उत्तराखंड मधिल देहरादून येथिल दुन स्ट्रायकर ग्राउंड येथे हे एकदिवसीय सामने खेळविण्यात येणार आहेत. यासाठी कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन, महाराष्ट्र संघामध्ये रमेश संकपाल, विवेक कदम आणि समीर म्हसे कर्जत, कल्पेश ठाकुर आणि विनोद पेडामकार रोहा, कल्पेश तवले आणि सुनील पाटील खालापूर, कमलाकर कोळी आणि मंगेश म्हात्रे पेण, वैभव सकपाळ खोपोली या रायगड जिल्ह्यातील दिव्यांग खेळाडूंसह परेश बाभनिया आणि धीरज सिंग अंबरनाथ ठाणे व विजय वळवी आणि राजू वळवी नंदुरबार यांची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. यासंघाचे कर्णधार म्हणून रमेश संकपाळ, प्रशिक्षक म्हणून शशांक हिरवे आणि संघव्यवस्थापक म्हणून शिवाजी पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

कुलाबा महाराष्ट्र संघाला नितिन वारंगे सरपंच रोठ बुद्रुक, संतोष कोळी सरपंच पिंगोडे, अजय म्हात्रे गडब पेण, महेश कोलाटकर सभापती रोहा, नितीन पाटील माजी उपसरपंच, नरेश पाटील सरपंच वरसे, नीलकंठ बडे, नाना बडे आदींनी या संघाला पुरस्कृत केले असून अपंग कल्याणकारी संस्था रायगड व समविचारी दिव्यांग पुनर्वसन व सामजिक संस्था रायगड असोसिएशनचे सचिव शिवाजी पाटील यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्र दिव्यांग संघ देहरादून येथे रवाना झाला आहे.

## सुशिला घरत यांच्या स्वखर्चातून पाईप लाईनचे काम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

असोसिएशन मधील रहिवाश्यांना सुरळीत पाणी पुरवठा व्हावा, यासाठी महानगरपालिकेच्या प्रभाग 'ड' सभापती सुशिला जगदिश घरत यांनी स्वखर्चाने पीव्हीसी पाईप लाईनचे काम करून दिले. नवीन पनवेल मधील ई १ ते ५ मधील पाणी पुरवठा पाइपलाईनचे काम भाजपच्या नगरसेविका व प्रभाग समिती सभापती सुशिला घरत यांनी स्वखर्चाने करून दिले.

## आरे बुद्रुक ग्रा.पं.वतीने समाजातील कर्तृत्वान व्यक्तींचा सन्मान सोहळा

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहा तालुक्यातील आरे बुद्रुक ग्राम पंचायत हद्दीतील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत समाजातील आदर्श व कर्तृत्वान व्यक्तींचे सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आले.

आरे बुद्रुक ग्रा. पं हद्दीतील कुंभोशी गावचे रहिवासी व माजी सरपंच एकनाथ मामा मळेकर यांचे चिरंजीव अनिल मळेकर यांनी भारतीय लष्कर सेवेमध्ये भारतीय सैनिक म्हणून तब्बल २२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवापूर्ण करून सेवानिवृत्त झाले त्याबद्दल त्यांच्या कर्तृत्वाला सलाम म्हणून तसेच रा. जि. परिषदेचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त खातेलीवाडी येथील मुख्याध्यापक ब्रिजेश बाळकृष्ण भादेकर तर आरे बुद्रुक येथील छत्रपती शिवाजी विद्यालय चे शिक्षकेत्तर कर्मचारी रविंद्र लक्ष्मण ठाकूर यांना आदर्श शिक्षकेत्तर पुरस्कार प्राप्त झाले अशा समाजातील आदर्श व कर्तृत्वान व्यक्तींचे ग्राम पंचायत आरे बुद्रुक च्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगच्छ देऊन सन्मानपूर्वक त्यांच्या उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य कर्तृत्वाचे गौरव करून याथोचित सत्कार करण्यात आला.


श्री.भाकरे साो.कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड. मदन ग. गोवारी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अ.क्र.१४५३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१२/२०२१

१) श्रीमती.निर्मला शंकर म्हात्रे
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
२) कु.प्राप्ती शंकर म्हात्रे
वय : २३ वर्षे, व्यव : नोकरी
दोघेही रा.मु.मराठी शाळेसमोर, तरघर,
उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील कै.शंकर हरी म्हात्रे हे दि.२९/०६/२०२१ रोजी मु.मराठी शाळेसमोर, तरघर, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.शंकर हरी म्हात्रे यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**अ) मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळकत अपार्टमेंट नं.ए-१/१०, तळमजला, सेक्टर क्र.१३, नवीन पनवेल (इ), जि.रायगड (क्षेत्रफळ १३.५० चौ.मी. बांधव)**

**ब) मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील प्लॉट मिळकत प्लॉट नं.१९९, सेक्टर नं.२४, मौजे : वहाळ (पुष्पक) ता.पनवेल, जि.रायगड (क्षेत्र २३० चौ.मी.)**

**क) मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मौजे/युनिट केस नं. | स.नं./ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| उलवे/६३ | ९१/७ | ०-०५-८ | ०.९४ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणे करिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.शंकर हरी म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.भाकरे साो.कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.एम.जी.गोवारी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अ.क्र.१४५७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१२/२०२१

१) श्री.संजीव श्रीपत म्हात्रे
वय : ४५ वर्षे, व्यव : शेती
२) श्री.गणेश श्रीपत म्हात्रे
वय : ४० वर्षे, व्यव :
३) श्री.अलंकार श्रीपत म्हात्रे
वय : ३७ वर्षे, व्यव :
वरील १ ते ३ रा.मु.पाटनोली,
पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.ललीता अशोक मढवी उर्फ ललीता श्रीपत म्हात्रे
वय : ४२ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.उमरोली, पो.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात ज्यापेक्षा अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील कै.श्रीपत हरी म्हात्रे हे दि.१४/११/२०२० रोजी मु.पाटनोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच मयत यांची दुसरी पत्नी कै.गंगाबाई श्रीपत म्हात्रे, ह्या दि.०७/११/२०१५ रोजी मु.पाटनोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच मयत यांची पहिली पत्नी कै.नामुबाई श्रीपत म्हात्रे ह्या दि.०३/११/१९९३ रोजी मु.पाटनोली, पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांस कोणतेही अपत्य नव्हते व नाही. तसेच मयत कै.श्रीपत हरी म्हात्रे यांची आई कै.यमुना हरी म्हात्रे ह्या देखील दि.१९/०५/१९७८ रोजी मौजे : उलवे येथे मयत झाल्या आहेत. आणि अर्जदार १) श्री.संजीव श्रीपत म्हात्रे, २) श्री.गणेश श्रीपत म्हात्रे, ३) श्री.अलंकार श्रीपत म्हात्रे, ४) श्रीमती.ललीता अशोक मढवी उर्फ ललीता श्रीपत म्हात्रे ह्यांनी या कोर्टास सदरहू मयत कै.श्रीपत हरी म्हात्रे यांच्या नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**ता.पनवेल, जि.रायगड**

| संकेतीक क्र./ युनिट के. क्र. | सर्वेक्षणा नुसार बांधकाम क्रमांक | बांधकामाचे पाया/ बांधी व क्षेत्र (चौ.मी) | बांधकामाचा वापर | भूखंड वाटपाची ठरविण्यास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| UL-V-ICOGD -226 | UL-६८६ | ७२.३२ | निवासी | ८३.७५ | पुष्पक | २४ | ३१८ | २६० |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

येणेप्रमाणे वारस दाखला मिळणे करिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.श्रीपत हरी म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



राव साहेब

अर्जदारतर्फे वकील (ॲड.प्रदीप एस. सावंत)

**जाहीर नोटीस**

मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर साो, पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अ.क्र.१४६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्री.शरद हरी गोवारी
व. वर्षे ५५, धंदा : शेती / नोकरी
रा.९१९, कोट नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड
२) श्री.राजेंद्र हरी गोवारी
व. वर्षे ५२, धंदा : शेती/नोकरी
रा.९१९, कोट नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड
३) सौ.सुलभा रमाकांत भोईर
व. वर्षे ४८, धंदा : गृहिणी
रा.तिसाई आई मंदिराजवळ, कोटनाका, उरण ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.अपर्णा अरुण गोवारी
व.व.५५, धंदा : गृहिणी
५) चि.अनुराग अरुण गोवारी
व.व.१८, धंदा : शिक्षण
६) कु.ऋतिका अरुण गोवारी
व.व.२१, धंदा : शिक्षण
७) कु.सृष्टी अरुण गोवारी
व.व.२३, धंदा : शिक्षण
८) कु.काजल अरुण गोवारी
व.व.२७, धंदा : शिक्षण
९) कु.सोनाली अरुण गोवारी
व.व.२९, धंदा : शिक्षण
नं.४ ते ९ सर्व रा.घर नं.९२१-१,
काळाधोंडा, राघोबा मंदिराजवळ, उरण — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — जाबदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सामाईक मालक कै.अलका हरी गोवारी ही दि.१७/०३/२०१८ रोजी मु.कोटनाका, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. तसेच कै. अलका हरी गोवारी यांची आई कै.जमना काशिनाथ उर्फ जनार्दन भोंबळे ही देखील दि.२२/०३/१९८० रोजी उरण येथे मयत झालेली आहे. त्याचप्रमाणे कै.अलका हरी गोवारी हिचा मुलगा कै.अरुण हरी गोवारी हा देखील दि.०४/०५/२०२१ रोजी घर नं.९२१-१, काळाधोंडा, राघोबा मंदिरा जवळ, उरण, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेला आहे. त्याअर्थी अर्जदार १) श्री.शरद हरी गोवारी, २) श्री.राजेंद्र हरी गोवारी, ३) सौ.सुलभा रमाकांत भोईर, ४) श्रीमती.अपर्णा अरुण गोवारी, ५) चि.अनुराग अरुण गोवारी, ६) कु.ऋतिका अरुण गोवारी, ७) कु.सृष्टी अरुण गोवारी, ८) कु. काजल अरुण गोवारी, ९) कु.सोनाली अरुण गोवारी यांनी खालील वर्णनाच्या सामाईक मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|
| काळाधोंडा | ११० | २६ | २ | ०.०२.०३ |
| | | २७ | ६ | ०.०२.०५ |
| | | ३२ | ६ | ०.०५.०३ |
| | | ३२ | १३ | ०.०६.०३ |
| | | ४२ | ६ अे | ०.०३.०५ |
| | | ५३ | १० अे | ०.०३.०५ |
| काळाधोंडा | ११२/८७ | ४४ | ११ | ०.०९.०१ |
| | | ५३ | १ | ०.०२.०८ |
| | | ५४ | २ | ०.०३.०५ |
| काळाधोंडा | ११०/८५ | ४० | ६ | ०.०६.०४ |
| | | ३५ | १ | ०.०४.०० |
| काळाधोंडा | ११२ | २६ | १० | ०.०४.० |

वरील अर्जदार हे मयत कै.अलका हरी गोवारी यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि जर अर्जदार हे कै.अलका हरी गोवारी यांचे वारस असल्याचे शाबीत झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.२६/१०/२०२१ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



श्री.भाकरे साो.कोर्ट

प्रो.जमा. १०० — अर्जदारातर्फे वकील श्री.अनिल वि. कर्णिक

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अ.क्र.१४१४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१६/११/२०२१

१) श्री.ऐजाज महामूदमियाँ पटेल
वय : ५२ वर्षे, धंदा :
पत्ता : ५४ अ, पटेल हाऊस, सेक्टर ३०, ओवे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
२) श्रीमती.नफिसा अमिरुद्दीन खोत
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : हाऊस नं.१७०, मंडई रोड, ठाणा बँकेच्या समोर, प्रभु आळी, भिवंडी, जि.ठाणे ४२१३०२
३) श्रीमती.रजिया शकील सय्यद
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : हाऊस नं.४७, आएशा मंझिल, डोंगरकर मस्जिद बंदर मोहल्ला, भिवंडी, जि.ठाणे ४२१३०८
४) श्रीमती.सईदा नसीर शेंदू
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : ५४ अ, सेक्टर ३०, टाटा हॉस्पिटल जवळ, ओवे गाव, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.साझिदा नासीर डाई
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : हाऊस नं.१३२०, ओवे गांव, सेक्टर ३०, टाटा हॉस्पिटल जवळ, ओवे गाव खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०
६) श्रीमती.नईमा अब्दुल सत्तार पटेल
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : १०५/ए, बाग-ए-फिरदूस कमसूद नगर, अलमास कॉलनी रोड, आशियाना कॉम्प्लेक्स जवळ, कौसा, मुंब्रा, ठाणे ४००६१२
७) श्रीमती.महेक सत्तार पटेल
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : बाग-ए-फिरदुस, रुम नं.१०५, अलमास कॉलनी रोड, आशियाना कॉम्प्लेक्स जवळ, कौसा, मुंब्रा, ठाणे ४००६१२
८) श्रीमती.अल्लाहरखी सिराजुद्दीन शेख
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : रुम नं.४०१, ईब्राहीम मॅनशन, अलमास कॉलनी, कौसा कब्रस्तान जवळ, मुंब्रा, ठाणे, जि.ठाणे — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांचे दि.२३/१२/२०१६ रोजी त्यांचे राहत्या घरी मु.ओवे, पो.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांना त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र.१ ते ८ हेच वारस आहेत. अर्जदार क्र.१ हे पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांचा मुलगा असून अर्जदार क्र.२ ते ५ या पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांच्या मुली आहेत. तसेच अर्जदार क्र.६ ही पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांची सून असून अर्जदार क्र.७ व ८ या पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांच्या नाती आहेत.

वस्तुत : पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांना अब्दुल सत्तार महामुदमियाँ पटेल आणि शब्बीर अहमद महमूदमियाँ पटेल अशी दोन मुले होती. पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांच्या सदरच्या मुलांचे त्यांच्या हयातीतच निधन झाले असून पै.अब्दुल सत्तार महामूदमियाँ पटेल यांना त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र.६ ते ८ असे वारस आहेत. (अर्जदार क्र.६ ही पै.अब्दुल सत्तार महामुदमियाँ पटेल यांची पत्नी असून अर्जदार क्र.७ व ८ या त्यांच्या मुली आहेत.) तसेच पै.शब्बीर अहमद महमूदमियाँ पटेल हे अविवाहित होते व त्यांचे विनाअपत्य निधन झाले आहे. त्याचप्रमाणे पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांचे पती पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल यांचे निधन देखील पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांच्या हयातीतच झाले होते.

पै.राबियाबिबी महमूदमियाँ पटेल यांचे पती पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल यांची त्यांचे सह हिस्सेदारांसह सामाईकातील मालकी व वहिवाटीतील खालील वर्णनाची शेतजमिनीची मिळकत होती.

**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| ९ | १ | २६-२८-०० | रु.६.९४ |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल यांच्या हिश्श्यास २६-२८-०० यापैकी ०-१०-८ एवढे क्षेत्र प्राप्त झाले होते व आहे.

वरील वर्णनाच्या मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडकोकडून दि.०१/०९/१९७० रोजीच्या परिपत्रकानुसार नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात आल्या आहेत व त्याकामी मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे महाराष्ट्र शासनाच्या १२.५ टक्के नुकसान भरपाई योजनेनुसार ॲवॉर्ड हे युनिट केस क्र.ओवे/३४४ नुसार पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल आणि त्यांचे सह हिस्सेदारांचे नावे जाहीर करण्यात आले आहेत. परंतु पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे मृत्यूपश्चात वर नमूद केलेल्या मिळकतीमधील त्यांच्या हिश्श्याचे म्हणजेच २६-२८-०० या पैकी ०-१०-८ या क्षेत्रास त्यांची पत्नी पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल हिचे व त्यांचे मुलगे व मुली यांच्या नावाची युनिट केस क्र.ओवे/३४४ मधील नोंद सीसी फॉर्मचे सदरी करण्यात आली होती व आहे. सबब पै.महामुदमियाँ अब्दुल रहीम पाटील उर्फ पटेल यांचा व त्यांचे पश्चात पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल जो हिस्सा वर नमूद केलेल्या मिळकतींमध्ये निघत आहे तो त्यांच्या वर नमूद केलेल्या मिळकतीच्या पात्रतेप्रमाणे त्यांना मिळणारे भूखंड सिडको कॉर्पोरेशन यांचेकडून घेण्यासाठी प्रस्तुतचे अर्जदार हे लायक व पात्र आहेत. तथापी त्याकरिता पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल वारस दाखला घेणे जरुरीचे आहे. अर्जदारांना सिडकोचे संबंधित खात्याकडून सांगण्यात आल्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. मयत पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांना अर्जात नमूद केलेल्या अर्जदार क्र.१ ते ८ व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत व अर्जदार क्र.१ ते ८ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब अर्जदार क्र.१ ते ८ यांना सदरचा वारस दाखला मागण्याचा पूर्ण कायदेशीर हक्क आहे. सदर नमूद मिळकतींमध्ये सदर वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्या व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा वकीलांमार्फत या न्यायालयात हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीत व मुदतीत हरकती न आल्यास मे.न्यायालय अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व अर्जदार क्र.१ ते ८ हे पै.राबियाबिबी महमुदमियाँ पटेल यांचे वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल. सदर नोटीस आज दि.२५/१०/२०२१ रोजी न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मिशन युवा स्वास्थ्य विशेष लसीकरण मोहिम

**दै.रायगड नगरी । मुरुड**

महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरु व्हावीत यादृष्टीने कोव्हीड लसीकरणाला वेग देत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मिशन युवा स्वास्थ्य मोहिम हाती घेण्यात आली असून शासनाने दिलेल्या सूचनेनुसार मुरूड वसंतराव नाईक महाविद्यालयात २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान ही मोहीम विद्यार्थ्यांनकरिता सुरू करण्यात आली आहे.महाविद्यालयीन लसीकरणाच्या आजच्या पहिल्या दिवशी २० विद्यार्थी विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आलेले आहे.

यावेळी मुरूड वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा- स्नेहा पाटील, महाविद्यालयाच्या विकास समिती सदस्या- वासंतीताई उमरोटकर, डॉक्टर- निशीगंध माळी, डॉ. श्रीशैल बहिरगुंडे, डॉ.सीमा नाहिद, डॉ.सुभाष म्हात्रे, डॉ.मुरलीधर गायकवाड, डॉ.जनार्दन कांबळे,नगरपरिषद आरोग्य विभागाचे अधिकारी-राकेश पाटील डॉ.नारायण बागुल, डॉ.मधुकर वेदपाठक, ग्रंथपाल- गजानन मुनेश्वर, नर्स-,सायली शिवाजी, नर्स- स्वेता विरूकुड, मुहिद हसवारे, संदेश दांडेकर, अच्युत पोतदार, हरि हवालदार, अनघा विरूकुड, अस्मिता सादुळकर विद्यार्थी आदिसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ विश्वास चव्हाण म्हणाले की कोरोनाच्या दिर्घ सावटांनंतर महाविद्यालय सुरू होत आहे.कोणीच विद्यार्थ्यां लसीकरण पासुन वंचित राहू नये त्याकरिता सरकाराने मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहिम राबवली असुन त्याअनुशंगाने महाविद्यालयात २६ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान ही मोहीम राबविण्यात येत असुन या मोहिमेत सर्व विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करण्याचा प्रयत्न असणार आहे.

तरी गैरहजर असणा-या विद्यार्थ्यांने मुरूड बाजारपेठ येथील फातीमा कुलसुम बेगम हॉस्पीटल येथील लसीकेद्रात जावुन आपलं लसीकरण करून घ्यावे. असे आव्हान यावेळी करण्यात आले. तसेच ज्या विद्यार्थ्यां लसीकरण केले नसेल त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर लसीकरण करून घ्यावे असे आव्हान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास चव्हाण यांनी केले. यावेळी सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.नारायण बागुल यांनी केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# उरण तालुक्यात भात कापणीला आला वेग मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी चिंतातूर

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात भात कापणी सुरू झाली असून सर्वत्र शेतमजुरांची टंचाई भासत असल्याने शेतकरी भातकापणीसाठी भातकापणी यंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात करतांना दिसत आहे. मात्र उरण तालुक्यात हे भात कापणी यंत्र पोहा-चले नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना भातपिक कापण्यासाठी मजुरांशिवाय पर्याय उरला नसल्याने मजुरां अभावी भातपिकांची कापणी वेळेवर होत नसल्यामुळे येथील शेतकरी चिंता-तुर झाला आहे.



निसर्ग चक्राचे बिघडलेले संतुलन आणि अवकाळी पडणारा पाऊस ही भिती शेतकऱ्यांच्या मनात असते. अशातच हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांची भात कापणी ची धावपळ सुरू होते परंतु भात कापणी करीता वेळीच मजूर मिळत नसल्याने येथील शेतकरी हवालदिल आहेत. दरम्यान नाईलाजाने शेतकरी कुटुंबातील नातेवाइकांच्या मदतीने येथील शेतकरी भात कापणीला ला-गले आहेत. उरण तालुक्यात विभागात अनेक ठिकाणी आदिवासी मजुरांचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे.

एकेकाळी भातकापणी झाल्यानंतर भातपिकांची कडवे चार दिवस चांगली वाळल्यानंतर त्याचे भारे बांधून ते उडव्यात रचून ठेवले जात असत त्यानंतर शेतातच खळा तयार करून त्याचे व्यवस्थित शेणाने सारवण करून त्यानंतर त्या गळ्यावर मळणी प्रक्रिया केली जात होती परंतू सध्याच्या लहरी पावसाच्या भितीने वर्षभर केलेले कष्ट व त्यासाठी केलेला अमाप खर्च वाया जावू नये म्हणून शेतकरी पिकें न वाळवताच व त्याची साठवणूक न करता ताबडतोब कापलेले भातपिक झोडून भात घरी आणत आहेत.

उरण तालुका हा भाताचे कोठार समजले जाते परंतु मागील काही वर्षापासून शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळ्या माध्यमातून नुकसान होत असल्याने तसेच येथील औद्योगिककरण शेतातील हमखास उत्पादनावर येत असलेली गदा पाहतां पूर्वी इतके भात शेतीतून विक्रमी उत्पादन प्राप्त होत नाही त्यातच भात शेती ही पूर्णता: पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना कधी ओला दुष्काळ तर कधी सुक्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे त्यामुळे तालुक्यात अनेक ठिकाणी जमीनी लागवाडी खाली न आणता त्या ओसाड ठेवल्या आहेत.

त्यामुळे या भागात भात शेतीकडे दुर्लक्ष झालेले दिसते आहे भात कापणी करीता कृषी खात्याकडून ५० टक्के अनुदानातून भात कापणी यंत्र उपलब्ध करून देत आहेत शेतकरी असल्याचा दाखला सातबारा उतारा व बँक खाते पासबुक आदी कागदपत्रे शेतकऱ्यांनी कृषी खात्याकडे दिली तर त्यांना हे यंत्र ५० टक्के सवलतीच्या दराने मिळणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले परंतु येथील शेतकऱ्यांना शेती परवडत नसल्याने भात पीक कापणी यंत्र घ्यायला कोणीच तयार होत नाही त्यामुळे ज्या मुठभर शेतकर्यांनी भातशेती लागवडीखाली आणली आहे त्यांना वेळेवर मजूर मिळत नसल्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे.

# खारीकवाडा ग्रामस्थांनी घेतली आ.जयंत पाटील यांची भेट

## विविध विकासकामांसाठी घातले साकडे

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील खारीकवाडा ग्रामस्थांनी अरविंद शेडगे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कामगार पक्षाचे नेते व आमदार जयंत पाटील यांची भेट शेतकरी भवनात घेण्यात आली. यावेळी शेडगे यांच्या समवेत उसरोली ग्रामपंचायतीचे सरपंच मनीष नांदगावकर, नितेश भणगे, केतन मांदाडकर, जयेंद्र दिवेकर, विनोद मेस्त्री, मधुकर तांबोळी, विलास तळेकर, आदी पंच कमिटी यावेळी उपस्थितीत होती. शेतकरी कामगार पक्षाचे मुरुड तालुका चिटणीस मनोज भगत यांनी ग्रामस्थांची भेट आमदार यांच्या सोबत व्हावी यासाठी या विशेष बैठकीचे त्यांनी आयोजन केले होते. त्याप्रमाणे खारीकवाडा ग्रासमथांची भेट आमदार यांच्या सोबत संपन्न झाली.



यावेळी पंच अरविंद शेडगे यांनी आमदार जयंत पाटील याना सांगितले कि, खारीक वाडा येथील ग्रामस्थांची लोकसंख्या वाढत असून त्यांच्या परिवारातील मुलांना शिकण्यासाठी अंगणवाडी व जिल्हा परिषदेची पहिली ते चौथी पर्यंतची शाळा उपलब्ध करून द्यावी. कारण लहान मुलांना नांदगाव मध्ये रहदारीच्या मुख्य रस्त्याला ओलांडून पलीकडे जात असताना वाढत्या वाहनांमुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने खारीकवाडा गावातील लोकांची मुख्य मागणी आहे कि, या परिसरातील लोकांसाठी शाळेसाठी जागा व नवीन अंगणवाडी साठी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती यावेळी ग्रामस्थांनी केली. यावर आमदार जयंत पाटील यांनी जागा उपलब्ध करून देणार असून शाळा व अंगणवाडीसाठी इमारत होण्याकामी तात्काळ रायगड जिल्हा परिषदेकडून निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.

यावेळी ग्रामस्थांनी खारीकवाडा येथील तलावाचे सुशोभीकरण तसेच समशानभूमी ग्रासमथांच्या नावावर व्हावी यासाठी आपले सहकार्य मिळावे अशी विनंती केली. यावर आमदार जयंत पाटील यांनी सांगितले कि, तलावाचे सुशोभीकरणासाठी माझ्या आमदार निधीतून हे काम पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. सातबाऱ्यावर खारीकवाडा स्मशान भूमी असा उल्लेख होण्यासाठी लवकरच महसूल विभागला पत्र देण्यात येणार असून हे सुद्धा काम मार्गी लावणार आहे. खारीकवाडा गावांनी एकसंघ राहून विकासाची कामे करून घ्यावी. शेतकरी कामगार पक्ष आपल्या सोबत असणार आहे. लवकरच मी खारीकवाडा गावात भेट देणार आहे. तसेच त्या वेळी आपण विविध कामांची भूमी पूजन करून घेणार असल्याचे आमदार जयंत पाटील यांनी ग्रामस्थांना सांगितले. यावेळी पंच अरविंद शेडगे यांनी ग्रामस्थांच्या वतीने आमदार जयंत पाटील यांचे आभार मानून गावाच्या विकासासाठी लक्ष्य देऊन सोबत राहण्याची विनंती केली.

# दिवाळी साहित्यांनी बाजारपेठ सजली

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर रोह्याची बाजारपेठ सजली असून खरेदीसाठी ग्राहकांची मोठी रेलचेल दिसून येत आहे.

गतवर्षी कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर दिवाळी सण हा साध्या पद्धतीने व शासकीय कोरोना नियमावलीचे करून साजरा करण्यात आला. तर गतवर्षी बाजारात ग्राहकच फारकले नसल्याने बाजारपेठेत ग्राहकांची विशेष गर्दी दिसून आली नाही. यावर्षी मात्र परिस्थिती थोडीफार बदलली असल्याने व कोरोनाचा प्रादूर्भावही विशेष जाणवत नसल्याने तसेच शासनाकडूनही काही बाबतीत बरीचशी सुट दिल्याने यावर्षी दिवाळी सण प्रत्येकाला मनासारखा साजरा करण्यात येणार आहे.

आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणाचे पार्श्वभूमीवर बाजारात कपडे, फटाके, भेटवस्तू, सोने-चांदी दागिने व्यापारी, नॉव्हेल्टी, मिठाई दुकाने आदी दुकानदारांनी आपापल्या दुकानात मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचे साहित्य विक्रीसाठी आणून ठेवल्याने तसेच त्यांची सुयोग्य पद्धतीने मांडणी केल्याने ग्राहकवर्ग त्याकडे आकर्षित होऊन खरेदीसाठी उत्सूक झाला असल्याचे पहायला मिळत आहे.



# अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फूट ६ इंच, बांधा बारिक चेहरा उभट, डोक्याचे केस वाढलेले काळे असून दाढी मिशीचे केस साधारण वाढलेले आहेत. अंगात न्ळ्यिा पांढऱ्या रंगाचा लायनिंगचा फूल शर्ट व निळ्या रंगाची जीन्स घातलेली आहे.


## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.विक्रांत बाळासाहेब पाटील मा.उपमहापौर, नगरसेवक पनवेल महानगरपालिका | ०१ सुकलेले मृत पाम झाड | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग १८ मधील पुरुषोत्तम गौरव सोसायटी समोरील रस्त्यावर (बिरमोळे हॉस्पिटल जवळ) पामचे झाड किड लागल्यामुळे सुकून गेलेले आहे. किड लागल्यामुळे झाड आतून पोकळ झालेले आहे. कोणत्याही क्षणी हे पाम चे झाड उन्मळून पडू शकते. त्यामुळे एखादी दुर्घटना होवून रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दुखापत होवू शकते. तसेच हे झाड एखाद्या वाहनावर पडले तर वित्तहानी व जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ०१ सुकलेले मृत पाम झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |
| २ | श्री.सुनिल वा शेणॉय व श्री.अनिल वा शेणॉय फायनल प्लॉट नं.१९५/३, पनवेल | ०३ पाम झाडे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं.१९५/३ पनवेल येथील नवीन बांधकाम कामामध्ये अडथळा निर्माण करणारे ०३ पाम झाडे तोडणेकामी परवानगी बाबत. |
| ३ | संचालक, ओम शिवम बिल्डर्स प्रा.लि. बी-१०४, ओम शिवम रेसिडेन्सी, प्लॉट नं.८ए+९, सेक्टर १७, कामोठे, नवी मुंबई | ०१ नारळ झाड | पनवेल महानगरपालिका हद्दीतील ओम शिवम रेसिडेन्सी प्लॉट क्रमांक ८ ए+९, सेक्टर १७, कामोठे येथील कंपाऊंडमधील एक नारळाचे झाड आवारातील सिमेच्या भिंतीवर ताण आणत आहे जे तुटून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ०१ नारळाचे झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.७९/४३३/२०२१
दिनांक : २६/१०/२०२१


# पो. नि. खेडकर कर्तव्यदक्ष तर संजय गांधी समाजसेवक पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । उतेखेल/माणगाव**

पोलीस प्रवाह तर्फे माणगांव तालुक्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ खेडकर यांना 'कर्तव्यदक्ष' तर विद्युत पर्यवेक्षक संजय गांधी यांना 'समाजसेवक' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सत्कार समारंभ सोमवार दि. २५ ऑक्टोबर रोजी माणगांव पोलीस ठाणे येथे पार पडला. यावेळी सहा. पो. नि. वराळे, सहा. पो. उप. नि. जितेंद्र वाटवे, मगर, पो. ह. पाटील, म. पो. ना. धनावडे, पो. ना. खिरीट, पो. शि. रामनाथ डोईफोडे, शाम शिंदे, गीते, म. पो. शि. मोरे, वझरकर, जेष्ठ पत्रकार अरुण पवार, मा. ता. पत्रकार सेवा संघाचे अध्यक्ष रविंद्र कुवेसकर, परेश शिंदे, गिरिश गोरेगावकर, निरंजन कळस, सुनील राजभर, नचिकेत म्हापसेकर, वैभव सत्वे, अमित जाधव, युवा नेते निलेश थोरे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पोलीस प्रवाह दिवाळी अंक खाकी पर्व २ चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

माणगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सत्कारमूर्ती अश्वनाथ खेडकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आमच्या पोलिसांच्या कामाची दखल घेऊन पोलीस प्रवाहाने केलेल्या सत्कारामुळे आम्हाला स्फूर्ती मिळते. तसेच हा सत्कार माझा एकट्याचा नसून आम्हा सर्व पोलिसांचा सत्कार आहे. सत्कारमूर्ती संजय गांधी यांनी विदुयत पर्यवेक्षक व समाजसेवक म्हणून माणगांव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड या तालुक्यात कोरोना काळात शासकीय कार्यालयात कसलीही भीती व जीवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा देऊन शासकीय कार्यालयातील वीज पुरवठा खंडित होऊ दिला नाही.

याबद्दल संजय गांधी यांना समाजसेवक या पुरस्काराने मान्यवर पो. नि. अश्वनाथ खेडकर, जेष्ठ पत्रकार अरुण पवार व रविंद्र कुवेसकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांना पितृशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष आणि भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांचे वडील भरत बाळूशेठ पाटील (डॅडी) यांचे सोमवारी (दि. २५) अल्पशा आजाराने निधन झाले. ७१ वर्षीय भरत पाटील हे सिडको युनियनचे माजी अध्यक्ष होते. त्यांच्यावर वहाळ येथील स्मशानभूमीत मंगळवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.



या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, उद्योगपती जे. एम. म्हात्रे, भरत पाटील यांचे पुतणे जि. प. सदस्य रवींद्र पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते. कै. भरत पाटील यांच्या पश्चात पत्नी माजी जि. प. सदस्य सुरेखा पाटील, दोन मुलगे संदीप आणि सुनील, मुलगी मनीषा, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# पालीत परबलकर परिवारा कडून गुणवंत विद्यार्थी व वृद्ध माता पित्यांचा गौरव

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील पाली येथील अन्वर परबलकर यांचे निवासस्थानी समाजातील वयोवृद्ध मातांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना देखील यावेळी गौरविण्यात आले. या सन्मानार्थीत आदिल अन्वर परबलकर, तौहिद आयुब पठाण, शाद अजीज पानसरे, मुस्कान शब्बीर पठाण या गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी समाजाने केलेल्या हृदय सत्काराने भविष्यात आमची जबाबदारी अधिक वाढली असून या सत्काराने आम्हाला प्रेरणा व प्रोत्साहन मिळाल्याची भावना व्यक्त केली.

या प्रसंगी बशीर महामुद परबलकर, आरिफ मणियार, समद पठाण, पप्पू परबलकर, इमदाद पठाण, हुसेन लद्दू, इब्राहिम पानसरे,अकबर पानसरे,नौशाद परबलकर, सईद पानसरे, राजू शेख, इरफान मुजावर, अल्तमश परबलकर, शायान परबलकर, शरपुद्दीन खानदेश,आयुब महाडकर, शब्बीर पठाण, अश्रफ पानसरे, जावेद शेख, अकबर शेख आदी उपस्थित होते. यावेळी यशवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व वृद्ध मातांचे आशीर्वाद घेतले.

